LatestLaws.com

Helping Good People Do Good Things

# JUDICIARY EXAMS QUESTION PAPER

**Free Downloadable Formats**

Hello Good People!

LatestLaws.com

# Maharashtra Judicial Service

**Mains Examination, 2012**

**Question Paper**

LatestLaws.com

दिवाणी न्यायाधीश (क.स्त.) व न्यायदंडाधिकारी (प्र.व)
मुख्य परीक्षा 2012

**R01**

**2012**

**२०१२**

# PAPER – I

# पेपर क्रमांक - १

## Civil Procedure Code, Transfer of Property Act, Specific Relief Act, Law of Contracts, Sale of Goods Act and Partnership Act

## सिव्हील प्रोसिजर कोड, ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट, स्पेसीफिक रिलिफ ॲक्ट, लॉ ऑफ कॉन्ट्रक्ट्स, सेल ऑफ गुडस ॲक्ट व पार्टनरशिप ॲक्ट

**Time : 3 Hours** | **Max. Marks : 100**
**वेळ : 3 तास** | **गुण : 100**

**Note :**
**सूचना :**

*(1) **All** questions are **compulsory**.*

*(१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.*

*(2) Question No. **1** carries **20** marks. **All** other questions carry **equal** marks i.e. **16** marks **each**.*

*(२) प्रश्न क्रमांक १ ला २० गुण असून उर्वरित **सर्व** प्रश्नांना **समान** म्हणजेच १६ गुण आहेत.*

*(3) Your answers must be to the point, wherever possible quoting the specific provision of law.*

*(३) उत्तरे मुद्देसुद असावीत. आवश्यक तेथे कायद्यातील तरतुदीं नमूद कराव्यात.*

*(4) Do not reproduce any question. Write only question's number against the answer.*

*(४) उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्न लिहू नयेत. फक्त प्रश्न क्रमांक नमूद करुन उत्तर लिहावे.*

*(5) Wherever option has been given, only the required number of responses in the serial order attempted shall be assessed. Excess responses shall be ignored.*

*(५) ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात त्या क्रमाने अपेक्षित प्रश्नसंख्येइतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील. उर्वरित अतिरिक्त ठरणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

P.T.O.

LatestLaws.com

(6) *"Other than cited cases, candidate should not write roll number, any names (including one's own), signature, address or any indication of one's identity anywhere inside the answer book otherwise he/she will be penalised."*

(६) *"उदाहरणादाखल दिलेल्या प्रकरणाशिवाय उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये. अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल."*

(7) ***English*** *version of the question shall be authentic in case of any ambiguity.*

(७) *कोणत्याही प्रकारच्या संदेहाच्या स्थितीत,* ***इंग्रजी*** *भाषांतर अधिकृत समजले जाईल.*

(8) ***All*** *questions have to be attempted only in one language, either in* ***English*** *or in* ***Marathi*** *as per the option given in application form.*

(८) *उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पर्यायानुसार* ***सर्व*** *प्रश्नांची उत्तरे* ***इंग्रजी*** *किंवा* ***मराठी*** *यापैकी एकाच भाषेत लिहिली पाहिजेत.*

---

**1.** Write a Judgement on the basis of the facts narrated below :
खाली नमूद केलेल्या कथनावरुन न्यायनिर्णय लिहा :
While writing Judgement :

(a) Adhere to the contents of Judgement as required under the Code of Civil Procedure.

(b) Frame and answer the issues properly.

(c) Wherever necessary, fill up details from your imagination.

(d) Give legal, logical and proper reasons for your findings.

(e) Conclude the Judgement with a proper Operative Order.

न्यायनिर्णय लिहिताना :

(अ) दिवाणी आचार संहितेमध्ये अभिप्रेत असलेल्या मसूद्याचे पालन करा.

(ब) योग्य ते मुद्दे काढा आणि त्यांची योग्य ती उत्तरे लिहा.

(क) आवश्यकतेनुसार तुमच्या कल्पनाशक्तीनुसार तपशील द्या.

(ड) तुमच्या निष्कर्षांच्या पुष्ट्यर्थ तर्कसंगत, कायदेशीर व योग्य कारणे द्या.

(इ) योग्य तो अंतिम आदेश लिहून न्यायनिर्णयाचा शेवट करा.

LatestLaws.com

## Averments in the Plaint

Plaintiff claims that he has agreed to purchase from defendant agricultural land bearing Survey No. 57 situated at Haveli District, Pune for consideration of Rupees two lac fifty thousand by executing an agreement of sale dt. 6.3.2009. On the date of agreement he has given to defendant earnest amount of Rupees fifty thousand and he was put in possession of the land. Sale deed was to be executed within six months from the date of agreement. As defendant failed to do so, plaintiff has filed this suit for specific performance of contract and in the alternate for refund of earnest amount with interest and compensation.

## Averments in the Written Statement

Defendant resisted the suit by contending that agreement is not enforceable as it was executed only as a security for loan amount of Rupees fifty thousand which he had borrowed from plaintiff for higher education of his daughter. He has repaid the loan amount of Rupees thirty thousand and was ready to repay the balance amount of Rupees twenty thousand. Plaintiff was never put in possession of the suit land. Plaintiff has suppressed these material facts. Plaintiff has also not pleaded his readiness and willingness to perform his part of the contract nor issued any notice to him before filing of this suit. Hence on all these grounds plaintiff's suit is liable to be dismissed with costs.

P.T.O.

LatestLaws.com

## वादपत्रातील कथने

वादीचे असे म्हणणे आहे की, ता. हवेली जि. पुणे येथील सर्व्हे नं. ५७ ही जमीन त्याने ६.३.२००९ रोजीच्या विक्री कराराने प्रतिवादीकडून किंमत रुपये दोन लाख पन्नास हजारास विकत घेण्याचे ठरलेले आहे. कराराच्या दिवशी त्याने प्रतिवादीस इसारापोटी पन्नास हजार रुपये दिले आणि प्रतिवादीने त्याला जमिनीचा ताबा दिला. करारापासून सहा महिन्यात खरेदीखत करण्याचे ठरले होते. परंतु प्रतिवादीने तसे न केल्याने वादीने खरेदीखत करून मिळणेसाठी किंवा विकल्पाने इसाराची रक्कम व्याजासह आणि नुकसान भरपाई सह मिळावी म्हणून हा दावा केला आहे.

## कैफियतीतील कथने

प्रतिवादीने वादीच्या दाव्याला विरोध करताना असे म्हटले आहे की, खरेदी कराराची पूर्तता करता येणार नाही, कारण हा करार प्रतिवादीने वादीकडून उसनवार म्हणून पन्नास हजार रुपये त्याच्या मुलीच्या उच्च शिक्षणासाठी घेतले होते त्या कर्जाऊ रकमेच्या हमी पोटी केलेला होता. त्याने कर्जाऊ रकमे पैकी तीस हजार रुपये वादीस परत केले आहेत आणि शिल्लक रक्कम रुपये वीस हजार देण्यास तो तयार आहे. वादीला दावा जमिनीचा कब्जा कधीहि दिलेला नाही. वादीने या महत्वाच्या गोष्टी दडवून ठेवल्या आहेत. वादीने असे कथन केलेले नाही की तो करार पूर्ण करण्यासाठी सदैव तयार आणि इच्छुक आहे. वादीने दावा दाखल करण्यापूर्वी प्रतिवादीस नोटीस दिलेली नाही. या सर्व कारणांवरून वादीचा दावा खर्चासह फेटाळण्यास पात्र आहे.

---

LatestLaws.com

2. Answer any ***two*** of the following sub-questions :
खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) Discuss the statement "there is no difference between error within jurisdiction and error outside jurisdiction".

(अ) "न्यायालयाच्या अधिकारतेच्या मध्ये झालेली चूक आणि अधिकारतेच्या बाहेर झालेली चूक यामध्ये काही फरक नाही" या विधानाची चर्चा करा.

(b) Discuss provisions relating to arrest and detention of Judgement debtor in civil prison in execution proceedings.

(ब) हुकुमनाम्याच्या अंमलबजावणी कामी न्यायनिर्णीत ऋणकोची अटक व दिवाणी कारागृहातील स्थानबद्दता या संबंधीच्या तरतूदींची चर्चा करा.

(c) Discuss the statement "Judgement and Decree are one and the same".

(क) "न्यायनिर्णय व हुकुमनामा हे दोन्ही एक सारखे आणि एकच आहेत" या विधानाची चर्चा करा.

3. Write short notes on any ***four*** of the following :
खालीलपैकी कोणत्याही ***चार*** संदर्भात टिपा लिहा :

(a) Costs, compensatory costs and costs for causing delay.

(अ) दावा खर्च, भरपाई खर्च आणि विलंब खर्च.

(b) Difference between Restitution and Restoration of suit.

(ब) प्रत्यास्थापना आणि दावा पुन्हा फैलावर घेणे यातील फरक.

(c) Powers of Appellate Court.

(क) अपिल न्यायालयाचे अधिकार.

(d) Rights, duties and liabilities of partners *inter se* and to third parties.

(ड) भागीदार, भागीदारीसंस्था यांचे परस्परांशी व त्रयस्थ पक्षांशी अधिकार, दायित्व व कर्तव्य.

(e) Stoppage in transit.

(इ) वस्तु मार्गात अडविणे.



LatestLaws.com

**4.** Answer any ***two*** of the following sub-questions :
खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा.

(a) Explain in detail the terms 'Subrogation', 'Redemption', 'Tacking' and 'Foreclosure' with reference to mortgage of property.

(अ) 'प्रत्यासन', 'विमोचन', 'जोडणी' आणि 'पुरोबंध' या शब्दांचे अर्थ मालमत्तेच्या गहाणासंदर्भात सविस्तरपणे सांगा.

(b) Explain in detail 'Transfer of property for the benefit of unborn person' with reference to 'Rule against perpetuity' and 'Vested interests'.

(ब) 'शाश्वतताविरोधी नियम' आणि 'निहित हितसंबंध' यांच्या अनुषंगाने 'न जन्मलेल्या व्यक्तीच्या लाभार्थ संपत्ती हस्तांतरण' हे सविस्तर विशद करा.

(c) Elaborate the correctness of the statement "A lessor cannot determine the lease so long as the lessee pays the rent".

(क) "जोपर्यंत भाडेकरु भाडे देत आहे तोपर्यंत भाडेपट्टाकाराला भाडेपट्टा समाप्त करता येत नाही" या विधानाच्या अचूकतेबद्दल सविस्तर सांगा.

---

**5.** Answer any ***two*** of the following sub-questions :
खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) Discuss the statement "All contracts cannot be specifically enforceable".

(अ) "सर्व करारांची विशिष्ट पूर्तता अंमलात आणता येत नाही" या विधानाची चर्चा करा.

(b) Discuss the circumstances under which injunction can be granted and cannot be granted.

(ब) कोणत्या परिस्थितीमध्ये मनाई हुकुम देता येतो आणि कोणत्या परिस्थितीमध्ये तो देता येत नाही याची चर्चा करा.

(c) Explain the statement "A suit simpliciter for declaration is not legally maintainable".

(क) "निव्वळ जाहीरनामा मागण्यासाठीचा दावा कायद्याने पात्र नाही" या विधानाचा अर्थ सविस्तरपणे विशद करा.

---

LatestLaws.com

6. Answer any ***two*** of the following sub-questions :
खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) Discuss the circumstances which render the Agreement void.

(अ) कोणत्या परिस्थितीमध्ये करारनामे अवैध ठरतात त्या परिस्थितींची चर्चा करा.

(b) Discuss the relations resembling those created by contract.

(ब) कराराद्वारे निर्माण झालेल्या संबंधांशी सादृश्य असलेल्या संबंधांबाबत चर्चा करा.

(c) Discuss the statement "Every breach of contract entails payment of compensation".

(क) "प्रत्येक करारभंगाबद्दल नुकसानभरपाई द्यावी लागते" या विधानाची चर्चा करा.

LatestLaws.com

SEAL

LatestLaws.com

दिवाणी न्यायाधीश (क.स्त) व न्यायदंडाधिकारी (प्र.व).
मुख्य परीक्षा - २०१२

**S01**

**2012**
**२०१२**

## PAPER – II
## पेपर क्रमांक – २

**Indian Penal Code, Evidence Act,**
**Code of Criminal Procedure, SC & ST (Prevention of Atrocities) Act, 1989**
**and Protection of Civil Rights Act, 1955,**
**Essay on Current Legal Topic**
**इंडियन पिनल कोड, एव्हीडन्स ॲक्ट,**
**कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर, एससी अँड एसटी (प्रिव्हेन्शन ऑफ ॲट्रासिटीज) ॲक्ट, 1989**
**अँड प्रोटेक्शन ऑफ सिव्हील राईटस् ॲक्ट, 1955,**
**करंट लिगल टॉपिकवरील निबंध**

SEAL

**Time : 3 Hours** — **Max. Marks : 100**
**वेळ : ३ तास** — **गुण : १००**

**Note :**
**सूचना :**

*(1) Questions No. **9** and **10** are **compulsory**.*

*(१) प्रश्न क्रमांक ९ व १० **अनिवार्य** आहेत.*

*(2) Answer any **six** from the remaining questions.*

*(२) उर्वरित प्रश्नांमधून कोणतेही **सहा** प्रश्न सोडवावेत.*

*(3) Marks to each question are indicated by figure in the margin on the right hand side.*

*(३) प्रश्नासमोरील उजव्या बाजूच्या समासातील अंक गुण दर्शवितात.*

*(4) Wherever option has been given, only the required number of responses in the serial order attempted shall be assessed. Excess responses shall be ignored.*

*(४) ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात त्या क्रमाने अपेक्षित प्रश्नसंख्येइतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील. उर्वरित अतिरिक्त ठरणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

P.T.O.

LatestLaws.com

*(5) Do not reproduce any question. Write only question's number against the answer.*

*(५) उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्न लिहू नयेत. फक्त प्रश्न क्रमांक नमूद करुन उत्तर लिहावे.*

*(6) "Other than cited cases, candidate should not write roll number, any names (including one's own), signature, address or any indication of one's identity anywhere inside the answer book otherwise he/she will be penalised."*

*(६) "उदाहरणदाखल दिलेल्या प्रकरणांशिवाय उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये. अन्यथा तो ती शिक्षेस पात्र ठरेल."*

*(7) **English** version of the question shall be held authentic in case of any ambiguity.*

*(७) कोणत्याही प्रकारच्या संदेहाच्या स्थितीत, **इंग्रजी** भाषांतर अधिकृत समजले जाईल.*

*(8) **All** questions have to be attempted only in one language, either in **English** or in **Marathi** as per the option given in application form.*

*(८) उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पर्यायानुसार **सर्व** प्रश्नांची उत्तरे **इंग्रजी** किंवा **मराठी** यापैकी एकाच भाषेत लिहिली पाहिजेत.*

---

**1.** Explain the difference between Summons trial and Summary trial. 10

समन्स व संक्षिप्त खटल्यांच्या संपरिक्षेमधील फरक स्पष्ट करा.

---

**2.** Write notes on any ***two*** :

कोणत्याही ***दोन*** बाबींवर टीपा लिहा :

(a) Plea Bargaining. 5

(अ) गुन्हयाची कबूली-शिक्षा युक्तीवाद (प्ली बारगेनिंग).

(b) Legal rights of arrestee. 5

(ब) अटक व्यक्तीचे कायदेशीर अधिकार.

(c) Limitation for taking cognizance of offences. 5

(क) अपराधांची दखल घेण्याची मुदत.

LatestLaws.com

(d) Liability of a member of the Scheduled Castes for insulting another member of the Scheduled Castes on the ground of untouchability. 5

(ड) अनुसूचित जातीच्या व्यक्तीने दुसऱ्या अनुसूचित जातीच्या व्यक्तीच्या अस्पृश्यतेच्या कारणावरून केलेल्या अपमानाची जबाबदारी.

(e) Liability of a person not belonging to a Scheduled Castes/Tribes for intentionally insulting a member of a Scheduled Castes/Tribes in any place within public view. 5

(इ) अनुसूचित जाती/जमातीच्या नसलेल्या व्यक्तीने अनुसूचित जाती/जमातीच्या व्यक्तीचा सार्वजनिक जागा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जागी उद्देशपूर्वक अपमान केल्याबद्दल जबाबदारी.

---

**3.** Write short notes. (any ***four***)
संक्षिप्त टीपा लिहा. (कोणत्याही ***चार***)

(a) First Information Report. $2\frac{1}{2}$

(अ) प्रथम खबरी अहवाल.

(b) Arrest to prevent commission of a cognizable offence. $2\frac{1}{2}$

(ब) दखलपात्र अपराध करण्यास प्रतिबंध करण्यासाठी केलेली अटक.

(c) Magistrate's power to direct Police officer to investigate cognizable offence. $2\frac{1}{2}$

(क) दखलपात्र गुन्हयाच्या प्रकरणात पोलीसांना अन्वेषण करण्यास फर्मावण्याचा न्यायदंडाधिकारी यांचा अधिकार.

(d) Power of the court to proceed against persons not being the accused appearing to be guilty of offence in any enquiry or trial. $2\frac{1}{2}$

(ड) अपराधाबाबत दोषी असल्याचे दिसणाऱ्या अन्य व्यक्ती विरुद्ध कार्यवाही करण्याचे न्यायालयाचे अधिकार.

(e) Compounding of offences. $2\frac{1}{2}$

(इ) अपराध आपसात मिटविणे.

(f) Prosecutor's power to withdraw from prosecution. $2\frac{1}{2}$

(फ) अभियोक्त्याचा खटल्यातून अंग काढून घेण्याचा अधिकार.

---



LatestLaws.com

4. Explain the concept of vicarious liability of offender in the light of relevant provisions with reference to "in furtherance of common intention", "in prosecution of common object of unlawful assembly" and "criminal conspiracy". 10

"दोन किंवा अधिक व्यक्तिंच्या समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ केलेली कृती", "बेकायदेशीर जमावाचे समान उद्दीष्ट साधण्यासाठी केलेली कृती." आणि "फौजदारीपात्र कट" या संकल्पनांच्या संदर्भातील कायद्याच्या प्रावधानांचा उहापोह करून अपराध्याची दुसऱ्याने केलेल्या कृत्याची जबाबदारी विषद करा.

---

5. Distinguish the following topics. (any ***four***)

फरक स्पष्ट करा. (कोणतेही ***चार***)

(a) Dowry death and harassment of a woman by husband or his relatives for illegal demands. $2\frac{1}{2}$

(अ) हुंडाबळी व बेकायदेशीर मागणीसाठी महिलेच्या नवऱ्याने किंवा त्याच्या नातेवाईकांनी तिला दिलेली क्रूर वागणूक.

(b) Insulting modesty of a woman and outraging her modesty. $2\frac{1}{2}$

(ब) स्त्री विनयत्वाचा अपमान आणि तिचा विनयभंग.

(c) Dishonest misappropriation of property and criminal breach of trust. $2\frac{1}{2}$

(क) मालमत्तेचा अप्रामाणिक अपहार व फौजदारीपात्र न्यासभंग.

(d) Forgery and making of a false document. $2\frac{1}{2}$

(ड) बनावटीकरण व खोटा दस्तऐवज बनविणे.

(e) Robbery and dacoity. $2\frac{1}{2}$

(इ) जबरी चोरी व दरोडा.

(f) Hurt and grievous hurt. $2\frac{1}{2}$

(फ) दुखापत व जबर दुखापत.

---

LatestLaws.com

6. Explain the procedure for proving contents of electronic record and truth or falsehood of those contents. 10

इलेक्ट्रानिक अभिलेखाचा मजकूर व त्या मजकूराची सत्यता किंवा असत्यता शाबित करायची रीत स्पष्ट करा.

---

7. Write notes. (any ***two***)

टीपा लिहा. (कोणत्याही ***दोन***)

(a) Concepts of contradiction, omission and subtraction. 5

(अ) विसंगती, गाळलेली बाब, न सांगितलेली बाब, या संकल्पना.

(b) Nature of questions to be asked to the witness during three stages of his examination. 5

(ब) साक्षीदाराच्या तपासणीतील तीन टप्प्यांवर विचारल्या जाऊ शकणाऱ्या प्रश्नांचे स्वरूप.

(c) Legality and evidential value of modern techniques of investigation such as Polygraph test, Narcoanalysis test and Brain fingerprinting test. 5

(क) पॉलीग्राफ टेस्ट, नारकोॲनालिसीस टेस्ट, ब्रेन फिंगर प्रिंटींग टेस्ट या सारख्या अन्वेषणाच्या आधुनिक तंत्रांचा कायदेशीरपणा व त्यांचे पुरावा मुल्य.

(d) Exceptions to general rule, "Hearsay evidence is not admissible". 5

(ड) "ऐकीव पुरावा स्विकार्य नाही" या साधारण नियमाचे अपवाद

---

8. Write short notes. (any ***four***)

संक्षिप्त टीपा लिहा. (कोणत्याही ***चार***)

(a) Fact in issue. $2\frac{1}{2}$

(अ) वादतत्वे.

(b) Relevancy of facts and admissibility in evidence. $2\frac{1}{2}$

(ब) तथ्यांची संबंधता व त्यांची स्विकार्यता.



LatestLaws.com

(c) Use of dying declaration after survival of its maker recorded by (a) police and (b) other than police official. $2\frac{1}{2}$

(क) पोलीसांनी आणि पोलीसांखेरिज अन्य कोणी नोंदवलेल्या मृत्यूपूर्व जवाबाचा-जवाब देणार वाचल्यावर होणारा उपयोग.

(d) Purpose and evidential value of test identity parade. $2\frac{1}{2}$

(ड) ओळख परेडचा उद्देश व पुरावा मुल्य.

(e) Refreshing of memory. $2\frac{1}{2}$

(इ) स्मृती उजाळा.

(f) *Res Gestae.* $2\frac{1}{2}$

(फ) एकाच घडामोडीचा भाग असणाऱ्या तथ्यांची संबंधता.

---

**9.** Write an essay on any ***one*** of the following topics. 20

खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा.

(a) Socio-legal aspects of female foeticide.

(अ) स्त्री भ्रूण हत्येची सामाजिक व कायदेशीर बाजू

(b) Hostility of witnesses – a challenge.

(ब) फितुर साक्षीदार – एक आव्हान.

(c) Effect of declining rate of conviction on the safety of a society.

(क) शाबित खटल्यांच्या घटत्या संख्येचा सामाजिक सुरक्षिततेवर होणारा परिणाम.

---

LatestLaws.com

**10.** Write a judgment on the following facts. 20

खालील घटनांच्या आधारे निकालपत्र लिहा.

Ram resides at Pune. He went to Nasik after locking his house. On his return he found that his lock and latch were broken. T.V. set & gold ornaments were stolen. He filed a report with the police. Investigation officer arrested Ravan and seized gold ornaments of Ram from Ravan's house under Panchanama in presence of two panchas. Ravan gave disclosure statement to Investigation officer that he would show a shop where he sold the T.V. set. He showed shop of Laxman but Ram's T.V. set was not found. Investigation officer submitted Charge Sheet.

On trial Panchas turned hostile. Ram and I.O. supported prosecution.

Asst. Prosecutor argued seizure of ornaments from house of Ravan and discovery of fact as to where he sold T.V. set are proved. Hence claims conviction. Defence lawyer submits that there is unexplained delay in filing FIR. On seizure of ornaments, independent witnesses have not supported. T.V. set is not recovered hence there is no use of showing the shop. He prays for acquittal. In alternate, he requests to extend the benefit of the Probation of Offenders Act.

राम पुण्याला रहातो. तो घराला कुलूप लावून नासिकला गेला. घरी परतल्यावर त्यास त्याचे घराचे कुलूप व कडीकोंडा तोडलेला आढळला. दूरचित्रवाणी संच व सोन्याचे दागिने चोरी गेले होते. त्याने पोलीसात फिर्याद दिली. चौकशी अधिकाऱ्याने रावणला अटक केली आणि पंचासमक्ष त्याच्या घरातून रामचे सोन्याचे दागिने पंचनामा करून जप्त केले. दूरचित्रवाणी संच ज्या दुकानात विकला, ते दुकान दाखवतो असे बयान रावणने चौकशी अधिकाऱ्यापुढे दिले. त्याने लक्ष्मणचे दुकान दाखविले पण रामचा दूरचित्रवाणी संच सापडला नाही. चौकशी अधिकाऱ्याने आरोपपत्र पाठविले.

खटला उभा राहीला तेंव्हा पंच फितूर झाले. राम आणि चौकशी अधिकाऱ्याने सरकारपक्षाला पुरक साक्ष दिली.

सहाय्यक सरकारी वकीलांनी, रावणच्या घरातून रामचे दागिने जप्त केले आणि, ज्या दुकानात दूरचित्रवाणी संच विकला ती जागा निष्पन्न झाली या गोष्टी शाबित झाल्या असा युक्तीवाद केला त्यामुळे त्यांनी रावणला शिक्षा देण्याची मागणीकेली. बचावपक्षाच्या वकीलांनी फिर्याद देण्यास झालेल्या विलंबाचे स्पष्टीकरण दिले नाही. दागिने जप्तीच्या बाबतीत स्वतंत्र साक्षीदार पंच यांनी सरकारी पक्षाला साथ दिली नाही. दूरचित्रवाणी संच न सापडल्याने रावणने दुकान-दाखविले याचा काही उपयोग नाही. म्हणून आरोपीची मुक्तता करावी अशी त्यांनी विनंती केली. विकल्पेकरून त्यांनी आरोपीला परिविक्षा अधिनियमाचा फायदा द्यावा असा युक्तीवाद केला.

LatestLaws.com

SEAL

LatestLaws.com